**सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद पालघर**

---

जा. क्र. पाजिप/आवि/ आस्था-५ /वशी/ ९०३ / २०१७    दिनांक :- २४/२/२०१७

---

वाचा:- 1. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही/1095 प्र.क्र.1/95/बारा,दि.8 जून 1995

2. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही/1096/प्र.क्र.33/95/बारा दि.20/03/1997

3. शासन निर्णय क्रमांक : वेतन-1106/प्र.क्र.30/सेवा-3 दिनांक 10 सप्टेंबर, 2007

4. शासन निर्णय क्रमांक : वेतन-1109/प्र.क्र.41/सेवा-3 दिनांक 01 एप्रिल, 2010

5. शासन निर्णय क्रमांक : वेतन-1109/प्र.क्र.44/सेवा-3 दिनांक 05 जुलै,2010

6. शासन निर्णय क्रमांक : वेतन-1109/प्र.क्र.44/सेवा-3 दिनांक 01 जुलै,2011

7. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-चार ब,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,बांधकाम भवन,मुंबई दिनांक 5/12/2012

8. पदोन्नती सभा दिनांक :21/12//2016 चे मंजूर इतिवृत्त

**आदेश :-**

उपरोक्त शासन निर्णयानुसार त्यातील विहीत निकषांची पूर्तता करणा-या गट क व ड (वर्ग-3 व 4) मधील कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती /आश्वासित प्रगती योजनेखाली पदोन्नतीतील कुंठितता घालविणेसाठी एकाच पदावरील बारा वर्षांच्या नियमित सेवेनंतर पदोन्नतीसाखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी मंजूर करण्यांत आलेली आहे. (पहिला लाभ) त्यांना उपरोक्त शासन निर्णय क्र 5 व .6 अन्वये पहिल्या लाभानंतर एकाच वेतनसंरचनेत 12 वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या कर्मचा-यांस पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना दुसरा लाभ म्हणून मंजूर करावयाची आहे.

त्यानुसार खालील नमुद केलेल्या गट क मधील कर्मचा-यांस पहिल्या लाभानंतर एकाच वेतनसंरचनेत 12 वर्षांची नियमित सेवा पूर्ण केलेल्या व सदर शासन निर्णयांत नमुद केलेल्या निकषांची पूर्तता करणा-या कर्मचा-यांस त्यांचे पदोन्नती साखळीतील वरच्या पदाची वेतनसंरचना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासून दुसरा लाभ म्हणून मंजूर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | सध्याचे कार्यालय | २ रा लाभांनतर मंजूर वरिष्ठ वेतन श्रेणी | वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| .०१ | श्रीम.रश्मी दत्तात्रेय पाटील | आरोग्य सहाय्यिका | प्रा.आ.केंद्र गो-हे | ५२००-२०२०० ग्रेड वे.३१००<br>९३००-३४८०० ग्रेड वे ४२०० | ०१/०३/२००९ ते ४/१२/२०१२ पर्यंत<br>५/१२/२०१२ पासून पुढे | |

या योजनेअंतर्गत उपरोक्त शासन निर्णयातील तसेच शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेप्रमाणे अटी व शर्ती या आदेशात समाविष्ट कर्मचा-यांना बंधनकारक राहतील. याबाबतीत खालील अटी व शर्तीकडे विशेष लक्ष वेधण्यांत येत आहे.

1)या आदेशामुळे कर्मचा-याचे जबाबदारी आणि कर्तव्य यांत वाढ होत नसली तरी नियमीत पदोन्नतीप्रमाणे वेतननिश्चितीचा लाभ देण्यांत येईल. मात्र वेतननिश्चितीचा मिळालेला हा लाभ त्यांच्या वेतनश्रेणीत कार्यात्मक (functional) पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही. वेतन निश्चिती खालच्या (विद्यमान) वेतनश्रेणीतील वेतनवाढ देय झाल्यानंतर करून घेण्यासंबधीचा विकल्प कर्मचा-यास द्यावयाचा असेल तर असा विकल्प हे आदेश प्राप्त झालेपासून एक महिन्याच्या आत देणे आवश्यक आहे.विहित मुदतीत असा विकल्प न दिल्यास वेतन निश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981 मधील नियम 11 (1) (ए) खाली केली जाईल.

2) जर कर्मचा-यांस विशेष वेतन मिळाले असेल तर या योजनेखाली वरीष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर कर्मचा-यांस मुळ वेतनश्रेणीत विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

3) सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ दिनांक 01 ऑक्टोंबर 2006 पासून लागू राहील. परंतू 01 ऑक्टोंबर 2006 ते 31 मार्च 2010 दिनांका पर्यंत काल्पनिकरित्या वेतननिश्चिती करून प्रत्यक्ष लाभ दिनांक 01/04/2010 पासून देण्यांत येईल.

Scanned by CamScanner

4) या आदेशान्वये कर्मचा-यास पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी मिळाली तरी कर्मचा-याचे नाव कनिष्ठ (मुळ)संवर्गाच्या जेष्ठता सुचित राहील आणि सेवा प्रवेश नियमांतील तरतुदीनुसार उपलब्ध रिक्ततेत योग्य वेळेत नियमित पदोन्नतीसाठी (functional promotion) त्याचा विचार करण्यांत येईल. नियमीत पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यास या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्याचप्रमाणे नियमित पदोन्नती नाकारलेल्या कर्मचा-यास देखील या योजनेचा लाभ मिळणार नाही. या आदेशात समाविष्ट कर्मचा-यांपैकी पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या /पदोन्नती नाकारलेल्या कर्मचा-यास विद्यमान पदाचे वेतनश्रेणीत पदावनत करण्यांत येईल. तशा आशयाचे बंधपत्र कर्मचा-याकडून लिहून द्यावे लागेल.

सदरचे आदेशान्वये पदोन्नती साखळीतील वरच्या पदाची वेतनश्रेणी मंजूर केल्याची नोंद संबधीत कर्मचा-यांचे सेवापुस्तकांत घेण्याची कार्यवाही तसेच संबधीत कर्मचा-यांची वेतन निश्चिती सबंधित विभागाने, कार्यालयाने करावयाची आहे.

5) सबंधित कर्मचा-यांस या योजनेचा लाभ यापूर्वी देण्यांत आला असल्यास त्या कर्मचा-यास या योजनेचा लाभ या आदेशात नाव असले तरी पुन्हा दिला जाणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

निधी चौधरी (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**जि.आ.अ.**

प्रत :-. श्रीम.रश्मी दत्तात्रेय पाटील यांना वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र गो-हे ता.वाडा याचे मार्फत .

प्रत:- वैद्यकिय अधिकारी,प्रा.आ.केंद्र—गो-हे ता.वाडा यांना माहीतीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- तालुका आरोग्य,प.स. वाडा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

प्रत :- ग.वि.अ पं.स.वाडा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी

प्रत :- आस्थापना नस्ती.

Scanned by CamScanner